**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in

## जाहिर प्रकटन

या जाहिर प्रकटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते कि, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा ''उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ मुंबई'' हा उपक्रम सोमवार, दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१ रोजी नेहरू सेंटर सभागृह, वरळी येथे सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. या उपक्रमाअंतर्गत महाराष्ट्र राज्याचे माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. श्री उदयजी सामंत व उच्च व तंत्र शिक्षण विभागातील मंत्रालय व सचिव स्तरावरील अधिका-यांसमवेत नेहरू सेंटर सभागृह, वरळी येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थी, पालक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यापीठीय कर्मचारी, विविध मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था आदि विविध घटकांच्या अडीअडचणी ऐकून घेऊन त्या सोडविणार आहेत.

श्रीमती ना.दा.ठा. महिला विद्यापीठाने सर्व संबंधित घटकांच्या सोयीसाठी विद्यापीठाच्या www.sndt.ac.in या संकेतस्थळाच्या मुखपृष्ठावर ''उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ मुंबई'' ही वेबलिंक निर्माण केलेली आहे. येथे संबंधितांना इंग्रजी अथवा युनिकोड मराठीतून आपले प्रश्न मांडता येणार आहेत. निवेदनाची/तक्रार अर्जाची सॉफ्ट कॉपी (Soft Copy) जोडण्याची/अपलोड करण्याची व्यवस्था तेथे उपलब्ध आहे. त्यानुसार मुंबई व मुंबई उपनगरातील, जिल्हयातील संबंधितांना कळविण्यात येते की त्यांनी आपले अर्ज/निवेदने शनिवार, २० फेब्रुवारी, २०२१ रात्री ११ वाजेपर्यंत सादर करावेत.

ज्यांना ऑनलाईन अर्ज/निवेदने सादर करणे शक्य झाले नाही अशांनी प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून माननीय मंत्री महोदय यांना आपले निवेदन सादर करावे.

(डॉ. मीना कुटे)
कुलसचिव, (अति.कार्यभार)

मुंबई - ४०० ०३२
१७ फेब्रुवारी, २०२१